गाणारा ढोल

आफ्रिकी लोककथा

लेखिका व चित्रे: ॲन रॉकवेल

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

एके दिवशी *सेलेन* नावाची एक लहान मुलगी नदीवर पाणी भरायला गेली. एक लहानसा कप पाण्यात बुडवून ती आपल्या मडक्यात पाणी भरू लागली. पाणी भरताभरता ती गाणेही गाऊ लागली. तिचा आवाज इतका मधुर होता की आजुबाजूची सारी जनावरे, अगदी वेळूच्या बनातील मगर आणि पाणघोडेही, आपली कामे सोडून तिचे गाणे तन्मयतेने ऐकू लागली.



तिथून थोड्याच अंतरावर उंच गवतामध्ये, एक माणूस आपला ढोल घेऊन तिचे गाणे ऐकत होता. तो ढोलवाला सभ्य माणूस असता तर शांतपणे गाणे ऐकून आपल्या वाटेने निघून गेला असता. पण तो एक कपटी माणूस होता. त्याच्या डोक्यात वाईट विचार आले. तो दबकत पावले टाकत गाणे गाणाऱ्या सेलेनच्या पाठीमागून तिच्या जवळ गेला. मग त्याने तिला उचलून आपल्या ढोलच्या आत टाकले आणि ढोलचे तोंड बंद केले.

ती ओरडण्याआधीच ढोलवाला तिला म्हणाला, "छोकरी, छान गातेस तू. आता ऐक माझं. जेव्हा जेव्हा मी हा ढोल बडवीन तेव्हा तेव्हा तू गाणं गायचंस. तू गायली नाहीस तर ढोल बडवण्याऐवजी मी तुलाच बडवीन!"

सेलेन घाबरली होती आणि त्यामुळे ढोलवाला सांगेल ते करायला ती तयार झाली. ढोलवाला सेलेनला घेऊन तिथून निघून गेला.

काही मैल दूर असलेल्या एका गावात तो पोहोचला, तेव्हा संध्याकाळ झाली होती. त्याने गावात एका रात्रीसाठी आसरा मागीतला.

गावाच्या प्रमुखाने त्याला गावात आसरा देण्याचे मान्य केले. मग त्याने ढोल वाजवून गावकऱ्यांनी दाखवलेल्या आदरातिथ्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची इच्छा व्यक्त केली.

“ढम् ढम्!” तो ढोल वाजवू लागला आणि आत बसलेली सेलेन लगेच गाऊ लागली. गावकरी मुग्ध होऊन तिचे गाणे ऐकू लागले.

ती गायची थांबल्यावर सगळे एकसुरात म्हणाले, “तुझा ढोल वाजवून आणखी एक गाणं ऐकव.”

ढोलवाला उत्तरला, “मला भूक लागलीय, मी थकलोय. त्यामुळे काही खाल्ल्याशिवाय मी ढोल वाजवू शकणार नाही.”

हे ऐकल्यावर लोक आपापल्या बगिच्यांमध्ये गेले. तिथे खाण्यासारखे जे जे काही मिळेल ते ते त्यांनी टोपलीत भरले. त्यात मोठमोठे सोनेरी भोपळे, गुबगुबीत रताळी, शेंगा आणि केळी होती. अन्न शिजवून ते बकरीचे दूध आणि मधापासून बनलेल्या मद्यासोबत ढोलवाल्याकडे घेऊन गेले. ढोलवाला अधाशासारखा खात गेला, खात गेला, पीत गेला, पीत गेला. त्याने सारे अन्न खाऊनपिऊन संपवून टाकले. मग “ढम् ढम्!” तो पुन्हा ढोल वाजवू लागला. सेलेन पुन्हा एकदा गाऊ लागली. आभाळात चंद्र उगवेपर्यंत ती गात राहीली, गात राहीली, गातच राहीली. शेवटी ती अंगाईगीत गाऊ लागली. गावकऱ्यांच्या डोळ्यांवर झोपेची गुंगी चढेपर्यंत ती गायची थांबली नाही.

मग सगळे लोक झोपायला गेले. ढोलवाल्याने ढोल उघडला आणि सेलेनला शिल्लक राहिलेले थंडगार चारपाच दाणे खायला दिले. खरंतर, खूप वेळ गायल्यामुळे तिला सपाटून भूक लागली होती.

सकाळ झाल्यावर ढोलवाला ढोल घेऊन दुसऱ्या गावात गेला. तिथेही आदल्या रात्रीसारखाच प्रकार घडला. पण यावेळी लोकांनी त्याच्यासाठी कोंबडीचा रस्सा बनवला. तो त्याने संपूर्ण पिऊन टाकला आणि सेलेनसाठी काहीच शिल्लक ठेवले नाही. तो गावोगावी भटकत राहीला. सगळीकडे हाच प्रकार घडू लागला. त्याच्या ढोलमधून निघणारे मधुर गाणे कुणी कधी ऐकले नव्हते. त्यामुळे जिथे जिथे तो जाई तिथे तिथे लोक त्याला सुग्रास पक्वान्ने खायला देत.

पण त्यातले कधी त्याने ढोलमध्ये बंद असलेल्या गरीब बिचाऱ्या सेलेनला दिले का? कधीच नाही. ती गाणे गाऊ शकेल इतपतच....चारपाच थंडगार दाणे किंवा भोपळ्याच्या थोड्या बिया.... तो तिला खायला देई.

इथे सेलेन घरी परतली नाही म्हणून तिचे आईवडील तिला शोधायला नदीवर गेले. पण ती तिथे दिसली नाही. फक्त तिचे पाणी भरलेले मडके त्यांना मिळाले. त्यांनी नदीतील मगरीकडे पाहिले आणि त्याने सेलेनला खाऊन टाकले का, असे त्याला विचारले. पण मगर आपले डोके हलवत पाण्यात पोहत दूर निघून गेली.



मग त्यांनी एक जिराफ बघितला. तो झाडाच्या शेंड्यावरची पाने खात होता. त्यांनी जिराफाला विचारले, “अहो जिराफदादा, लांबलचक मानेमुळे तुमची नजर दूरपर्यंत पोहोचते. तुम्ही आमच्या मुलीला पाहिलंय का?” पण जिराफने आपले डोके हलवले आणि तो पुन्हा पाने खाऊ लागला.

मग त्यांनी गवतात लोळत बसलेल्या सिंहाला विचारले, “आमची लहान मुलगी, सेलेन कुठे आहे? ती गाणे खूप गोड गाते. तू तिला खाऊन टाकलेस का?”

पण सिंहाने आपली आयाळ हलवली आणि तो पळून गेला.



आईवडील इथे-तिथे भटकत राहीले. मग त्यांना एक हत्ती दिसला.

“हत्तीदादा....तुम्ही तुमच्या मोठ्यामोठ्या कानांनी ....आमच्या मुलीची काही खबर ऐकलीय का?”

पण हत्तीने हळूवारपणे त्याचे डोके हलवले आणि तो रमतगमत निघून गेला.

मग त्यांना एक कुरूप, बेढब तरस भेटला.

“तरसभाऊ, आमची लहान मुलगी सेलेन कुठाय, माहितीय का तुम्हाला? ती गाणं खूप गोड गाते.” “

पण तरस त्यांना खिजवल्यागत ओंगळपणे हसला आणि दबकत पावले टाकत निघून गेला.

कित्येक दिवस सेलेनचे आईवडील तिचा शोध घेत भटकत राहीले. जाईल तिथे त्यांनी आपल्या मुलीबाबत चौकशी केली. पण कुणीही तिला पाहिले नव्हते किंवा तिच्याबद्दल ऐकले नव्हते. गावोगावी, जंगले आणि मैदानांतून फिरल्यामुळे आईवडील धुळीने माखले, त्यांचे कपडे मळून गेले. पण त्यांची मुलगी काही त्यांना सापडली नाही.

एकदा संध्याकाळी थकल्याभागल्या अवस्थेत ते एका गावात थांबले. त्यांनी गावकऱ्यांकडे रात्रीपुरता आसरा मागितला. गावकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. त्या गावात आणखी एक अनोळखी माणूस थांबला होता. पण सेलेनच्या आईवडिलांना पुरेल इतकी जागा गावात होती. तो अनोळखी माणूस, दुसरातिसरा कुणी नसून, गाणाऱ्या ढोलचा मालकच होता.

"ढम्! ढम्!" ढोल वाजू लागताच त्यातून गाणे उमटू लागले.



ढोलमध्ये बसलेली सेलेन आपल्या गावात दिसणाऱ्या दृश्यांचे वर्णन गाण्यातून करू लागली. *सोनेरी कोवळे ऊन....उंच गवतात बागडणारी छोटी हरणे....बकऱ्यांच्या पिल्लांचा कलकलाट....आभाळाला भिडणारे निळे डोंगर.*

ही आनंदी दृश्ये आपल्याला पुन्हा पाहायला मिळणार नाहीत, असे वाटत असल्यामुळे तिच्या स्वरात दुःख जाणवत होते. त्यामुळेच कदाचित आजवर तिने गायलेल्या गाण्यांपेक्षा हे गाणे जास्त गोड वाटत होते. सगळे लोक श्वास रोखून, कान देऊन हे गाणे ऐकू लागले. फक्त एका व्यक्तिशिवाय!

मग ढोलवाल्याने ढोल वाजवणे बंद केले. त्याला भूक लागली म्हणून गावकऱ्यांनी त्याच्यासाठी सुंदर पक्वान्ने आणली. ढोलवाला खात राहिला, खात राहिला, खातच राहिला.

"मला तहान लागलीय!" दहा माणसे खातील एवढे अन्न खाल्ल्यावर तो म्हणाला. लोकांनी मडकी भरून मद्य आणले. तो पीत राहिला, पीत राहिला, पीतच राहिला. सेलेनचे वडील त्याच्याजवळ बसून त्याच्या अद्भुत ढोलाची स्तुती करू लागले, त्याला आणखी खाण्यापिण्याचा आग्रह करू लागले.

सेलेनने गायला सुरुवात करताच ढोलवाल्याशेजारी बसलेल्या तिच्या आईला रडू फुटले. तिने तिच्या मुलीचा आवाज ओळखला. पण सेलेनच्या वडिलांनी आईकडे कठोरपणे पाहिल्यामुळे ती गप्प बसून गाणे ऐकत राहिली. बराच वेळ ढोल वाजत राहीला आणि त्यातून एकापेक्षा एक सुंदर गाणी उमटत राहिली.

“बाहेर ये, बाहेर ये,” कुजबुजत त्यांनी तिला घट्ट धरले.

शेवटी वीस माणसांएवढे मद्य पिऊन, एक मोठी जांभई देऊन तो झोपी गेला. सर्व गावकरीदेखील झोपण्यासाठी आपापल्या घरी गेले. पण सेलेनच्या आईवडिलांनी झोपण्याचे फक्त सोंग घेतले. थोड्याच वेळात, ढोलवाला माणूस सिंहाच्या गर्जनेपेक्षा मोठमोठ्याने आवाज करत घोरू लागला. सगळे झोपी गेले याची खात्री पटताच, सेलेनचे आईवडील दबक्या पावलांनी ढोलजवळ गेले. त्यांनी ढोलचे तोंड उघडले आणि आत पाहिले. त्यात एक लहान बारीक मुलगी होती. घाबरलेली, एकाकी!

मग वडिलांनी आगीत एक लाकूड जाळले आणि ते घेऊन गुपचुप जंगलात गेले.

एका मोठ्या जुन्या झाडाजवळ त्यांनी ते जळते लाकूड धरले. काही वेळातच झाडाच्या भोकातून बऱ्याचशा मधमाशा बाहेर आल्या. जळत्या लाकडातून निघणारा धूर त्यांना पसंत नव्हता.

बाहेर पडल्यावर कुठे जायचे हे मधमाशांना कळेना. सेलेनचे वडिल जळते लाकूड घेऊन मधमाशांच्या मागे मागे पळू लागले. त्यामुळे मधमाशा आणखी पुढे पुढे उडू लागल्या. अशा प्रकारे ते मधमाशांना गावात ढोलवाल्या माणसाच्या निकट घेऊन गेले.

ढोलचे भोक मधमाशांना झाडाच्या भोकासारखेच वाटले. सगळ्या मधमाशा ढोलच्या आत शिरल्या. वडिलांनी त्वरित ढोलचे तोंड बंद केले आणि एक स्मित केले.

मग सेलेन आणि तिचे आईवडील हे तिघेही झोपी गेले.

सकाळ झाल्यावर गावकरी जागे झाले. त्यांनी ढोलवाल्याला पुन्हा ढोल वाजवायला सांगितले. तिथे असलेल्या त्या लहान मुलीकडे कुणाचेच लक्ष गेले नाही. कारण त्यांना ढोलमधून निघणाऱ्या मधुर गाण्याशिवाय दुसरे काहीच सुचत नव्हते.

त्यांनी ढोलवाल्याला आर्जवे केली. “जाण्यापूर्वी आम्हाला तुझ्या ढोलचं गाणं ऐकायचंय.”

आपल्या पोटावरून हात फिरवत ढोलवाला म्हणाला, “थोडीशी न्याहारी मिळाली असती तर ढोल वाजवायला मजा आली असती.”

गावकऱ्यांनी वचन दिले की त्याने छोटेसे गाणे ऐकवले तर ते त्याच्यासाठी रात्रीपेक्षा जास्त खायला आणतील, शिवाय त्याला भेटवस्तूही देतील. कारण गावकऱ्यांच्या घरातील सर्व अन्न संपले होते. ढोलवाल्याला खायला आणायला त्यांना बगीच्यात जावे लागणार होते.

ढोलवाल्याने त्यांची विनंती मान्य केली.

“ढम्! ढम्!” तो ढोल वाजवू लागला. पण त्यातून गाणे ऐकू आले नाही.

“ढाम्! ढाम्! ढाम्!” तो रागाने ढोल बडवू लागला.

पण काहीच घडले नाही. काही गावकरी त्याला हसू लागले.

“ढाम्! ढाम्! ढाम्! ढाम्! ढाम्! ढाम्!” वारंवार ढोल बडवूनही काहीच घडत नव्हते. आता सर्व गावकरी त्याला मोठमोठ्याने हसू लागले. मग त्याने ढोल जमिनीवर फेकला, त्याला लाथ मारली आणि ओरडू लागला. पण ढोल आपला गप्पच होता.

शेवटी ढोल उचलून तो ढोलवर ओरडत गावातून पळून गेला, “तू गायली नाहीस तर माझा मार खाशील, असं म्हटलं होतं मी तुला. आता मी तुला मारणार.”

एवढे बोलून त्याने सेलेनला मारण्यासाठी ढोलचे तोंड उघडले. पण घडले ते विपरीतच!

अचानक ढोलच्या आतून मधमाशा बाहेर आल्या....असंख्य मधमाशा!

“गुंsssssssगुंsssssss” करत त्या ढोलवाल्याच्या मागे उडू लागल्या. त्यानंतर तो ढोलवाला कधीच कुणाला दिसला नाही.

इथे गावकरी त्यांच्या बगीच्यांमध्ये जाण्याआधी सेलेनने त्यांना एक छानसे गाणे ऐकवले. गावकऱ्यांनी तिला वेगवेगळी पक्वान्ने खायला दिली. ढोलमध्ये बसून बसून तिला खूप भूक लागली होती. गावकऱ्यांनी तिला एक सुंदरसा हारही दिला. मग सेलेन आणि तिचे आईवडील आपल्या घरी निघाले.

गोष्टीबद्दल थोडेसे

दक्षिण आफ्रिकेच्या *बंटू* जमातीतील लोकांमध्ये नरभक्षी *जिमवीं*बद्दल बऱ्याच गोष्टी प्रचलित आहेत. ही गोष्टही एका जिमवीबद्दल आहे. वेगवेगळ्या टोळ्या त्याचे वेगवेगळ्या प्रकारे वर्णन करतात. काल्पनिक जिमवीच्या गोष्टी फक्त मनोरंजनासाठी ऐकवल्या जातात. आफ्रिकेतील बऱ्याचशा लोककथा या धार्मिक किंवा प्रवचनपर असतात. जिमवी कोणतेही रूप धारण करू शकतो आणि आपली भूक भागवण्यासाठी काहीही कपट-कारस्थाने करू शकतो. कधी तो राक्षस बनतो, कधी टांगेवाला, तर कधी आफ्रिकेचा सर्वात दुष्ट तरस बनतो. कधी तो एक सामान्य माणूस बनण्याचे ढोंग करतो. पण मुळात तो खूप लोभी असतो.